।। सा विद्या या विमुक्तये ।।

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपुरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED

"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)

Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

जनसंपर्क कार्यालय (PUBLIC RELATIONS OFFICE)

Phone: (02462) 229325 Website: www.srtmun.ac.in E-mail: srtmunpro1@gmail.com

संदर्भ क्र.: ज.का./२०२१-२२/९१ दि.३०/०७/२०२१

## 'स्वारातीम' विद्यापीठातील इलेक्ट्रॉनिक मिडीयाचे निकाल जाहीर

### अर्चना चौधरी सर्वप्रथम

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील माध्यमशास्त्र संकुलाच्या इलेक्ट्रॉनिक मीडिया निकालाची उज्वल परंपरा कायम ठेवत अर्चना अनंतसिंह चौधरी या विद्यार्थिनीने ७२.७३ टक्के गुण प्राप्त करून सर्वप्रथम तर अमित मुंडिक द्वितीय आणि रुसिका बोरा हिने अनुक्रमे तृतीय क्रमांक पटकाविला आहे.

माध्यमशास्त्र संकुलात चालणाऱ्या एम.ए./एम.एस.सी. इलेक्ट्रॉनिक मिडीया या पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे निकाल नुकतेच जाहीर झाले आहे. यात संकुलातील सर्वच विद्यार्थ्यांनी उत्तम कामगिरी करत बी+ मुल्यांकन प्राप्त केले. सदर विषयाचे अभ्यासक्रम हे प्रात्यक्षिक आधारित आहे आणि या लॉकडाऊन च्या भीषण परिस्थितीतही विद्यार्थ्यांनी अतुलनीय कामगिरी बजावली आहे. नियमितपणे ऑनलाईन मार्गदर्शन आणि मागील वर्षी संकुलात केलेल्या प्रात्यक्षिक कार्यामुळे हे यश शक्य झाल्याची ग्वाही सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी यावेळी दिली.

विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. उद्धव भोसले, प्र-कुलगुरू डॉ. जोगेन्द्रसिंह बिसेन, संकुलाचे संचालक डॉ. दिपक शिंदे यांनी उत्तम गुण प्राप्त व सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले तर संकुलातील डॉ. राजेंद्र गोनारकर, डॉ. सुहास पाठक, डॉ. सचिन नरंगले, डॉ. कैलाश यादव, राहुल पुंडगे, अनुजा बोकारे इत्यादींनी त्यांचे अभिनंदन करून उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

---

प्रति,

मा. संपादक/ जिल्हा प्रतिनिधी,

दैनिक/इलेक्ट्रॉनिक मेडिया/सामाजिक संपर्क माध्यम,

सप्रेम नमस्कार,

मान्यवर/ महोदय,

उपरोक्त बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिद्धीस देऊन सहकार्य करावे, ही नम्र विनंती.

आपला विश्वासू,

जनसंपर्क अधिकारी,

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,

ज्ञानतीर्थ, विष्णुपुरी, नांदेड - ४३१ ६०६.